माहितीचा
अधिकार

अपिल प्राधिकारी तथा
उप आयुक्त (अतिक्रमण/अनधिकृत
बांधकाम निर्मुलन विभाग)
पुणे महानगरपालिका
जा.क्र.ई/११६८ दिनांक : २४/७/१७

---

**अपिल प्राधिकारी तथा उप आयुक्त (अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग), पुणे महानगरपालिका मुख्य कार्यालय, पहिला मजला खोली क्र.११९, शिवाजीनगर, पुणे-४११००५. यांचेकडील आ.क्र.ई/५/५२५,दि.२३/६/२०१७ चे महापालिका आयुक्त कार्यालयाकडील पत्रासोबतचा प्रथम अपिल अर्जावरील सुनावणीबाबत.**

श्री. नरेंद्र त्रिबंक हंबीर
रा.: ४०, बुधवार पेठ,
पुणे-४११००२. } अपिलार्थी

विरूध्द ......

जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अतिक्रमण निरिक्षक
पुणे महानगरपालिका. } जाब देणार

---

<u>विषय</u> : माहिती अधिकार २००५ कायद्यान्वये आपण केलेल्या प्रथम अपिल अर्जावरिल सुनावणीबाबत.

<u>संदर्भ</u> : १) श्री. नरेंद्र त्रिबंक हंबीर यांनी माहितीचा अधिकार २००५ कलम १९ (१) अन्वये
अ) इकडील आ.क्र.ई/५/५२५,दि.२३/०६/२०१७ रोजीचा आपला दाखल प्रथम अपिल अर्ज.
ब) इकडील आ.क्र.ई/५/५२६,दि.२३/०६/२०१७ रोजीचा आपला दाखल प्रथम अपिल अर्ज.
२) या कार्यालयाकडील जा.क्र.ई/१०३७,दि.१०/०७/२०१७ अन्वये संदर्भ क्र.१ चे मधील आपले अ) व ब) अपिल अर्जावरील सुनावणीकरीता दि.१८/०७/२०१७ रोजी उपस्थित राहणेकरीता श्री. नरेंद्र त्रिबंक हंबीर यांना पाठविलेले पत्र.

## <u>सुनावणी तपशील</u>

संदर्भ क्र १ चे आपले अ) व ब) प्रथम अपिल अर्जाचे सुनावणीसाठी या कार्यालयाकडील जा.क्र.ई/१०३७, दि.१०/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये दि.१८/०७/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग, पुणे म.न.पा. मुख्य कार्यालय, पहिला मजला खोली क्र.११९, शिवाजीनगर, पुणे-४११००५ येथे हजर रहाणेबाबत आपणास कळविण्यात आले होते. त्यानुसार आपणातर्फे अपिलाबाबत युक्तीवाद सादर करण्याकरीता दि.१८/०७/२०१७ रोजी सदर प्रथम अपिलाच्या सुनावणीकामी आपण उपस्थित होता. प्रथम अपिल अर्जाच्या सुनावणीकामी अपिल अर्जातील जाब देणार जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अतिक्रमण निरिक्षक व संबंधित अधिकारी हे प्रस्तुत सुनावणीचे दिवशी उपस्थित होते.

त्यानुसार आपल्या अ) व ब) प्रथम अपिल अर्जावर आमचे कार्यालयात आपले म्हणणे एकून घेवून सदर अपिल अर्जाचे सुनावणीनंतर खालीलप्रमाणे निर्णय देण्यात आला आहे.

## <u>"निर्णय"</u>

<u>अपिल अर्ज अ):-</u> मुद्दा क्र.१ बाबतची कळविण्यात आलेली माहिती मान्य आहे. मुद्दा क्र.२ मधील मागणी केलेल्या तक्रार अर्जांच्या प्रती देण्यात आलेल्या आहेत. परंतु याच मुद्द्यामध्ये मागणी केलेल्या निरा स्टॉलचे नोंदणी पत्राबाबत कोणताही आवश्यक तो तपशील अर्जात नमूद नसल्यामुळे खात्यास माहिती पुरविण्यात आली नाही, ही बाब अर्जदार यांनी मान्य केली असून त्याबाबत संपूर्ण तपशीलवार माहिती पुरविल्यास उपलब्ध माहिती अर्जदार यांना पुरविणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेश देण्यात येत आहेत.

Scanned by CamScanner

**अपिल अर्ज ब):-** मुद्दा क्र.१ मध्ये विचारलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने माहितीचा अधिकार २००५ अन्वये माहिती देता येत नसलेबाबत आपणास लेखी पत्रान्वये कळविण्यात आले होते. या प्रकरणी कायद्यातील तरतुदीबाबत आपणास माहिती देण्यात आली आहे. आपले सदर तक्रार अर्जातील नमूद निरा स्टॉल संबंधित भागाचे सहा.अतिक्रमण निरिक्षक यांनी संबंधितास समज देवून त्यावेळी हटवून घेण्यात आल्याचे समक्ष सुनावणीत सांगितले. परंतु सदरच्या निरा स्टॉलवर पुन्हा नियमानुसार कारवाई करणेबाबत विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाचे श्री. लोंढे, सहा.अतिक्रमण निरिक्षक यांना आदेश देण्यात आले. मुद्दा क्र.२ या मुद्यामध्ये मागितलेल्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत आपणास देणेबाबत श्री. लोंढे यांना आदेश दिले.

उपरोक्त सुनावणीमध्ये वरीलप्रमाणे निर्णय देण्यात आलेला असून त्याची पुर्तता करणेची कार्यवाही जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अतिक्रमण निरीक्षक यांनी करावयाची आहे.

(सौ. संध्या गागरे) २४.०७.१५
अपिल प्राधिकारी तथा
उप आयुक्त
(अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग)
पुणे महानगरपालिका
२४/७

**प्रत :**

१) जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अतिक्रमण निरीक्षक
अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग,
पुणे महानगरपालिका.

२) श्री. राजु लोंढे, सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक,
कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका.

Scanned by CamScanner